**महाराष्ट्र शासन**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग**
**मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड - 422101**
**दुरध्वनी क्र. :** 0253-2461439 **Email : dycomplan.nashik@maharashtra.gov.in**
**विभागाचे नाव : नियोजन शाखा** **संकलन : कुंभमेळा**

प्रति,
मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिक.

विषय:- दिनांक 20 मार्च 2025 रोजी विविध अधिकाऱ्यांसमोर नाशिक शहर आणि परिसरातील गोदावरी नदीवर बांधता येऊ शकणाऱ्या संभाव्य घाटाच्या पाहणीचे इतिवृत्त.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन दिनांक 20, मार्च 2025 रोजी रोजी मा. विभागीय आयुक्त, नाशिक महोदय यांनी विविध अधिकाऱ्यांसमोर नाशिक शहर आणि परिसरातील गोदावरी नदीवर बांधता येऊ शकणाऱ्या संभाव्य घाटाच्या जागांची पाहणी केली.

सदर पाहणीचे इतिवृत्त सोबत पाठविण्यात येत असून मा. विभागीय आयुक्त महोदय यांचे सूचनेनुसार इतिवृत्त आपले कार्यालयाचे स्तरावर सर्व संबंधित कार्यान्वयीण यंत्रणांना निर्गमित करण्यात येवून इतिवृत्तात नमुद केल्याप्रमाणे त्या-त्या विभागाशी संबंधीत असलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करुन तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा. ही विनंती.

आपला विश्वासू,
**Signed by Yogendra Ashok Chaudhari**
**Date: 25-03-2025 14:18:46**

सोबत. इतिवृत्त.

(योगेंद्र चौधरी)
उपआयुक्त (नियोजन)
नाशिक विभाग, नाशिक

गोदावरी नदीवर बांधता येऊ शकणाऱ्या संभाव्य घाटाच्या जागांच्या पाहणीचे इतिवृत्त

दिनांक 20/03/2025 रोजी डॉ.प्रवीण गेडाम, विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांनी विविध अधिकाऱ्यांसमोर नाशिक शहर आणि परिसरातील गोदावरी नदीवर बांधता येऊ शकणाऱ्या संभाव्य घाटाच्या जागांची पाहणी केली. त्यावेळी पुढील अधिकारी उपस्थित होते.

1. श्रीमती मनिषा खत्री, आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक
2. श्री राजेश गोवर्धने, अधीक्षक अभियंता, लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक
3. श्रीमती सोनल शहाणे, कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग
4. श्री. किरण चव्हाण, उपायुक्त, नाशिक शहर, पोलीस
   व वरील अधिकाऱ्यांचे सहकारी

त्यावेळी विभागीय आयुक्तांनी पुढीलप्रमाणे सुचना दिल्या आहेत.

1. या दरम्यान पुढील जागांना भेटी देण्यात आल्या. त्या जागांची यादी गंगापुर धरणाखाली लगेच रस्त्यावर, दत्तमंदीरजवळ, सोमेश्वर मंदीर आणि धबधब्याजवळ, लक्ष्मीनारायण मंदीराच्या खाली डाव्या बाजुला, नंदिनी गोदावरी संगम, आगर टाकळी, दसच पंचक आणि त्यावरची बाजू, ओढा गाव, शिलापुर गाव

2. भेटी दरम्यान विभागीय आयुक्त यांनी खालील प्रमाणे सुचना दिल्या.

   i. पाहणी केलेल्या सर्व जागा आणि याशिवाय घाटांसाठी इतर संभाव्य जागा जागाच्या ठिकाणी किती लांबी आणि रुंदीचे घाट बनू शकतात याचा अंदाज घ्यावा आणि सदर लांबी रुंदी, स्थळ आणि येण्याजाण्याचे मार्ग आणि इतर अनुषंगिक बाबी गुगल किंवा उपग्रहाच्या छायाचित्र असलेल्या नकाशावर दर्शवावे. यावरुन या ठिकाणी प्रती तास आणि प्रती दिन किती भाविकांना स्नान करता येईल याचा अंदाज करावा. त्याचप्रमाणे वाहतुकीचे किंवा गर्दीच्या अवागमनाचे येण्याचे आणि जाण्याचे मार्ग इत्यादीचा अंदाज घेऊन यापैकी कोणते घाट विकासासाठी घ्यावे याचा अंदाज नाशिक शहर पोलीसांनी घ्यावा.

   ii. अशाच प्रकारची प्रक्रिया जलसंपदा विभागाने त्र्यंबकेश्वर ते नाशिक शहर या गोदावरीच्या पट्ट्यासाठी करावी आणि तसेच नाशिक शहर आणि त्याखाली इतर संभाव्य ठिकाणी कुठे घाट बांधले जाऊ शकतात याबाबत करावी आणि संबंधित माहिती ग्रामीण / शहर पोलीस आणि महानगरपालिका नाशिक यांना द्यावी.

या माहितीच्या आधारे पोलीस विभागांनी आवश्यक त्या घाटाच्या बांधकामाबाबत शिफारस करावी.

3. मागील कुंभमेळयाच्या वेळी घाटाचे बांधकाम नदी किनाऱ्यापासुन काही रुंदीचे पुर्णत: सिमेंट कॉंक्रीटचे होते. याला इतर पर्याय तपासावेत. उदा. रिटेनींग वॉल आणि त्यामागे भरावाला दाबून कॉम्पॅक्ट भराव इ. अशा वेगवेगळया प्रकारे ढोबळ मानाने खर्चाचे अंदाज लागू करावेत.

4. अधिक्षक अभियंता यांनी आनंदवल्ली आणि आगरटाकळी या ठिकाणी रबरी बलूनचे बंधारे घेणे योग्य राहील असे सुचित केले. तरी यामुळे होवू शकणारे पाण्याचे नियंत्रण आणि या प्रकल्पाचा कॉस्ट बेनेफिट ॲनालायसिस तपासून या बाबतचा निर्णय घ्यावा.

Signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 25-03-2025 13:36:22

(डॉ. प्रवीण गेडाम)
अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती
तथा विभागीय आयुक्त, नाशिक.